ठाणे महानगरपालिका,ठाणे
राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय
छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय
जाहिरात (संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)

ठाणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या आस्थापनेवर **अटेंडट या संवर्गातील रिक्त असलेली १२ पदे** १७९ दिवसांच्या कालावधीसाठी हंगामी पदावर भरण्यासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांनी ठाणे महानगरपालिकेच्या dean@thanecity.gov.in या email पत्त्यावर सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज PDF format मधे किंवा Scan करुन पाठवावा.

सर्व कागदपत्रे मुलाखतीचे वेळी सादर करावी. कागदपत्रे नसणारे मुलाखतीस अपात्र ठरतील.

विहित नमुन्यातील अर्जाव्यतिरिक्त इतर कागदपत्रे email द्वारा सादर करु नये.

अर्ज दिनांक १०.११.२०१७ ते २४.११.२०१७ पर्यत भरावे.

मुदतीनंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

पदभरतीबाबत विस्तृत विवरण ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

| पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव | वेतन | वय |
|---|---|---|---|---|
| अटेंडट | १२ | १० वी पास.शवविच्छेदन (पोस्ट मार्टेम) विभागात काम केल्याच्या अनुभवास प्राध्यान्य. | १५,०१५/- दरमहा ठोक वेतन | २८ वर्षापर्यत |

टिप :-

१) उमेदवाराने अर्ज भरताना शैक्षणिक अर्हतेमध्ये गुणांची टक्केवारी, अनुभवाचा कालावधी माहिती बिनचूक टाकावी. अर्ज भरण्यास चूक झाल्यास अर्ज नाकरण्यात येईल.
२) उमेदवारांनी अर्जामध्ये जो अनुभव लिहीला आहे तो विचारात घेण्यात येईल. त्या व्यतिरिक्त अधिकचा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.
३) अनुभवाची गणना करताना शासकीय/निमशासकीय, स्थानिक संस्थेकडील कामकाजाच्या अनुभवासाठी प्रतिवर्षी ६ गुण असे धरण्यात येईल. प्रति तीन महिन्यांसाठी १.५ असे गुण धरण्यात येईल. तीन महिन्याच्या आतील अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

४) पोस्ट मार्टेम (शवविच्छेदन) विभागात  काम केल्याचा अनुभव विचारात घेतला जाईल. असे उमेदवार न मिळाल्यास १०० खाटा असलेल्या रुग्णालयातील कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांचा विचार केला जाईल.

५) 'अनुभवाची अट' याची पूर्तता करणारे उमेदवार मुलाखतीस नसल्यास नवोदित उमेदवारांची नेमणूक केली जाईल व परिक्षेतील गुण व प्रयत्न यानुसार  गुणानुक्रम ठरेल. प्रत्येक वाढीव प्रयत्नांसाठी वजा पाच गुण दिले जातील.

६) मुलाखतीस पात्र असलेल्या उमेदवारांची यादी ठाणे महापालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.उमेदवारांनी सदरची यादीमध्ये स्वत:चे नाव तपासून मुलाखतीस उपस्थित रहावे. त्याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

७) उमेदवारांना मिळालेले गुण जर समान असतील तर वयाने ज्येष्ठ उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

८) उमेदवाराने सादर केलेला अनुभवाचा दाखला अथवा इतर कोणताही दाखला बोगस आढळुन आल्यास अशा उमेदवारावर फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकेल व त्याची जबाबदारी संबधित उमेदवारावर राहील. या अस्थायी पदांसाठी जातीधिष्ठीत आरक्षण लागु नाही.

९) भरती प्रक्रियेचा तपशिल ठाणे महापालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यासाठी वैयक्तिक स्वरुपात उमेदवारांनी पत्रव्यवहार करु नये अथवा संपर्क साधु नये.

**अटी व शर्ती**

१) जाहिरातीमध्ये प्रसिध्द केलेल्या पदांमध्ये अंशत: बदल करणे, पदांच्या एकुण व संवर्ग निहाय संरचनेमध्ये वाढ किंवा घट तसेच निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उचित पध्दतीचा अवलंब करुन उमेदवाराची चाळणी करण्याचे सर्व अधिकार महापालिकेने राखुन ठेवलेले आहेत.याबाबत उमेदवाराला कोणतीही तक्रार अथवा दावा सांगता येणार नाही.

२) उमेदवारांनी जाहिरातीस अनुसरुन आपले अर्ज दिनांक १०.११.२०१७ ते २४.११.२०१७ पर्यत dean@thanecity.gov.in या email पत्त्यावर, Scan करुन किंवा  PDF format मधे पाठवावेत. अपलोड करावेत. ऑनलाईन प्रक्रियेशिवाय केलेले अर्ज नाकारण्यात येतील.

३) प्राथमिक छाननी अंती ज्या उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात आलेले नाहीत, अशा उमेदवारांमधुन उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.नावे संकेतस्थळावर येतील.

४) जे अर्जदार भरती प्रक्रियेसाठी पात्र ठरणार नाहीत अशा अर्जदारांना याबाबत वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही आणि अर्जदारांस त्याबाबत विचारणाकरता येणार नाही. उमेदवारांनी ठा.म.पा.च्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावरुन माहिती घ्यावी.

५) शैक्षणिक अर्हता, वय,अनुभव,अधिवास दाखला (Domicile Certificate) वैध असलेले, इत्यादी प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती मुलाखतीचे वेळी मुळ दाखल्यासह सादर करणे आवश्यक आहे. चुकीची माहिती असल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारला जाईल.

६) सदर कर्मचा-यांना शव विच्छेदन तसेच मृतदेहाशी संबधित व इतर विभागांच्या कामासाठी सहाय्य करावे लागेल.

७) वेळोवेळी वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाचे पालन करणे.

८) उमेदवारांस मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

९) मुलाखतीचे दिनांकाचे दिवशी उमेदवाराचे वय वयोमर्यादेमध्ये असणे आवश्यक आहे.

१०)स्थानिक पोलिस स्थानकाचा संपूर्ण पत्ता अर्जावर नमूद करण्यात यावा.

११)उमेदवाराने शैक्षणिक पात्रता, अनुभव व मुलाखतीत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे व त्या उमेदवाराची कागदपत्रे वैध ठरल्यास अंतिम निवड यादी तयार केली जाईल.

१२) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली अथवा मुलाखतीस उपस्थित राहीला म्हणजे मुलाखतीस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

१३) उमेदवारांनी महानगरपालिकेकडे अर्ज सादर करतांना न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई संबधीची माहिती महानगरपालिकेस देणे आवश्यक आहे. सदर माहिती न दिल्यास उमेदवाराची सेवा कोणत्याही टप्प्यावर रदद् करण्याचे अधिकार महानगरपालिकेस असतील.

१४)(i) शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१० दि.२७ जुन २०११ नुसार ज्या परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

(ii) सदर परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परिक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या परिक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.अशा प्रकरणांत देखिल अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

(iii) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परिक्षार्थीसाठी लागू राहतील. इतर परिक्षार्थी/उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

१५) सदर जाहिरातीनुसारची भरती स्थगित करणे किंवा रदद् करणे, अंशतः बदल करणे,प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रदद् करण्याचा अधिकार प्रशासन राखुन ठेवत आहे.

१६) उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने यावे लागेल.

१७) एखाद्या अर्जदाराने त्यांची निवड करणेसाठी निवड समिती अध्यक्ष, सदस्य तसेच अधिका-यांवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाब आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यांस निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

१८) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची निवड/नियुक्ती तात्काळ रदद् करण्यात येईल/शासकीय सेवेत असल्यास बडतर्फ करण्यात येईल.

१९) सुवाच्च अक्षरात भरलेला सोबतचा अर्ज.

२०) पासपोर्ट आकाराचे दोन फोटो.

२१) मुलाखतीच्या वेळेस उमेदवाराने शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे, वास्तव्याचा पुरावा या कागदपत्रांचा संच व या संचाची एक झेरॉक्स प्रत स्वसाक्षांकित सोबत आणावी.
२२) जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला.
२३) स्थानिक पोलिस स्टेशनमधून चारीत्र्य व वास्तव्य दाखला निवड झाल्यावर सात दिवसांत देणे बंधनकारक आहे.
२४) निवड झालेल्या उमेदवाराने विहित नमुन्यात एक हमीपत्र नेमणूक पत्रानंतर सात दिवसांत देणे बंधनकारक आहे.
२५) पदाची मुदत जास्तीत जास्त १७९ दिवस असेल.
२६) नियुक्त होण्याच्या तारखेचा उल्लेख नेमणूक पत्रात असेल. त्या तारखेपासून १७९ दिवस मोजले जातील. ती नेमणूकीची अंतिम तारीख असेल.
२७) उशिराने हजर होणा-यांसाठी अंतिम तारखेत बदल केला जाणार नाही.
२८) हंगामी (अस्थायी ) भरती केलेल्या या पदांवर सरळसेवेने भरती करण्यात आल्यास सदरची हंगामी (अस्थायी) नेमणूक रदद् करण्यात येईल/होईल.

**नियुक्तीची समाप्ती :-**

१) १७९ दिवसांनंतरसेवा आपोआप समाप्त होईल.
२) अधिष्ठाता यांनी कारवाई केल्यास.
३) एक महिन्याची नोटिस दिल्यास.

२९) हंगामी नेमणूकीच्या अनुभवामुळे सरळसेवा भरतीत प्राधान्य दिले जाणार नाही.
३०) १७९ दिवसानंतर/अंतिम तारखेनंतर आवश्यकता भासल्यास हंगामी नेमणूकांची प्रक्रिया पुनश्च नव्याने राबविण्यात येईल. कार्यरत कर्मचारी त्यासाठी नव्याने अर्ज करु शकतील. मुदतवाढीबाबत प्रशासनाचा निर्णय अंतिम राहील. तसेच मुदतवाढ दिली गेल्यास खंड कालावधी धरुन एकुण सलग तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी नेमणूक करण्यात येणार नाही.
३१) नेमणुक पत्र दिनांकापासुन सात दिवसांत प्रत्यक्ष हजर होऊ न शकणा-या/न होणा-या उमेदवारांऐवजी प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची नेमणूक केली जाईल.

**अटेंडट (फक्त पुरुष उमेदवारांकरीता) पदावर १७९ दिवसांच्या नेमणूकीसाठी अर्ज**

फोटो

१) नाव :-

२) वय :- ३) लिंग :-

३) A.वास्तव्याचा पत्ता (पुरावा आवश्यक) B) स्थानिक पोलिस स्टेशनचा पत्ता.

दूरध्वनी क्रमांक
ईमेल

४) शैक्षणिक अर्हता (कागदपत्रे आवश्यक)

| **अर्हता** | **उत्तीर्ण वर्ष** | **शाळा -जिल्हा** | **गुण%** | **प्रयत्न** |
|---|---|---|---|---|
| एस एस सी | | | | |
| अनुभव | | | | |

गुणपत्रिका व उत्तीर्ण झाल्याचा दाखला मुलाखतीचे वेळी सादर करावा.
५) पोस्ट मार्टेम विभागात काम केल्याचा अनुभव आहे/नाही
अ) i) १०० वा त्याहून अधिक खाटा असणा-या रुग्णालयातील अनुभव आहे/नाही
ii) सरकारी आस्थापनेतील अनुभव

क) सरकारी आस्थापना/दवाखाना/ प्रसुतीगृह रुग्णालय
६) अधिवास प्रमाणपत्र आहे/नाही
७) शाळेचा दाखला (SLC) आहे/नाही
८) जन्म दाखला आहे/नाही

दिनांक :- स्वाक्षरी :-

**हमीपत्र**

मी -------------------------------------------------- वय वर्ष ---------- राहणार --------- ----------------------------------------- या हमीपत्राद्वारे जाहिर करतो/करतो की, अटेंडट पदावरील नेमणूकीसाठी भरलेला अर्ज व आवश्यक कागदपत्रे ही पूर्णतः खरी असून त्याबाबत जर काही खोटेपणा असल्याचे सिध्द झाल्यास मी माझी नियुक्ती रदद् होईल हे जाणतो. तसेच अशा परिस्थितीत माझ्यावर प्रशासकीय तसेच फौजदारी कारवाई होई शकते याची मला जाणीव आहे.

माझी नेमणूक जास्तीत जास्त १७९ दिवसांसाठी असून ती मी पूर्ण करेन. मुदतपूर्व राजीनामा दिल्यास मी प्रशासकीय व आवश्यक त्या फौजदारी कारवाईस पात्र राहीन. मुदतपूर्व राजीनामा दिल्यास ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर या किंवा इतर पदांवर नेमणूक करताना माझे नाव वगळण्यात येईल व आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही केली जाईल /जाऊ शकते याची मला जाणीव आहे.

सहीः-

नाव :-

दिनांक :-